**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ६.०० )**

**गुरुवार दिनांक २३ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

**1. विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी समाजाच्या सर्व घटकांना समान संधी मिळणं आवश्यक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन**

**2. बहीण भावांमधील प्रेम, स्नेह आणि जिव्हाळ्याचं प्रतीक असलेल्या भाऊबीज सणानिमित्त सर्वत्र चैतन्य**

**3. नागपूरच्या मिहान आर्थिक क्षेत्रात संरक्षण आणि एरोस्पेस उत्पादन प्रकल्पासाठी 233 एकरचा भूखंड मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सुपूर्द**

**4. भारत - ऑस्ट्रेलिया तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांची मालिका ऑस्ट्रेलियानं २-० अशा फरकानं जिंकली**

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी समाजाच्या सर्व घटकांना विशेष करून वंचित आणि मागास समुदायाला समान संधी मिळणं आवश्यक आहे असं, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सांगितलं. केरळमधल्या राजभवनात माजी राष्ट्रपती के.आर.नारायणन् यांच्या पुतळ्याचं राष्ट्रपतींच्या हस्ते अनावरण झालं त्यावेळी त्या बोलत होत्या.

***A nation moved ahead to achieve the goal of Viksit Bharat. It is essential to ensure that all citizens, especially the weakest and most marginalised, get equal opportunities to realise their dreams. KR Narayan has left behind a legacy of morality, integrity, compassion And Democratic state.***

के.आर.नारायणन् यांनी प्रामाणिकपणा, करुणा आणि उच्च लोकशाही मूल्यांचा वारसा ठेवला असल्याचं त्यांनी सांगितलं. नारायणन् यांनी राष्ट्र निर्माण आणि सर्वसमावेशक देशाच्या निर्मितीसाठी आपलं आयुष्य समर्पित केलं असंही त्या म्हणाल्या.शिक्षण हाच समाजाच्या विकासाचा आधार आहे यावर, नारायणन् यांचा दृढ विश्वास होता असा उल्लेख त्यांनी केला.

**संरक्षण मंत्री**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आज, नवी दिल्ली इथं होणाऱ्या, द्वैवार्षिक नौदल कमांडर्स परिषदेला, संबोधित करणार आहेत. आपल्या भाषणात, संरक्षणमंत्री २०४७ पर्यंत, व्यापक राष्ट्रीय हितसंबंध आणि, विकसित भारताचं व्हिजन डॉक्युमेंट सादर करतील.काल सुरू झालेली, तीन दिवसांची परिषद ऑपरेशन सिंदूरनंतर, नौदलाची भविष्यातली, युद्ध सज्जता आणि तयारीच्या दृष्टीनं महत्त्वपूर्ण मानली जात आहे

**दिवाळी-भाऊबीज**

आज कार्तिक शुद्ध द्वितीयेला, भाऊबीज हा सण पारंपरिक उत्साहात साजरा होत आहे. बहिणी आज भावाला ओवाळून, त्याच्या दीर्घायुष्याची आणि सुख-समृद्धीची प्रार्थना करतात. भावंडांमधील प्रेम, स्नेह आणि जिव्हाळ्याचं प्रतीक असलेल्या या सणानिमित्त, घराघरांत आनंदाचं वातावरण दिसून येत आहे. ऐकुया यावर, आमचा विशेष रिपोर्ट -

***पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना आज भाऊबीजेनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भाऊ बहिणींमधल्या स्नेह आणि विश्वासाचं प्रतीक असलेल्या भाऊबीजेचा सण प्रत्येकाच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि सौभाग्य घेऊन येवो, या नात्याची वीण आणखीन घट्ट व्हावी, अशी कामना पंतप्रधानांनी आपल्या संदेशात व्यक्त केली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही भाऊबीजेनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील निमगाव गुरु इथं संतोष आणि अरुण धारे यांनी भाऊबीज सणाच्या निमित्तानं बहिणीला संविधानाच्या प्रास्ताविकेची प्रतिमा भेट देत संविधानिक मूल्ये जपण्याचा संदेश दिला. संविधानाचं अमृत महोत्सवी वर्ष लक्षात घेऊन त्यांनी हा अभिनव उपक्रम राबवला. तर बुलढाणा जिल्ह्यातील चिखली विधानसभा आमदार श्वेता महाले पाटील यांनी भाऊबीजच्या निमित्ताने मतदारसंघातील सर्व बांधवांचे औक्षण करून त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. यवतमाळच्या पुसद इथं 'माणुसकीची भिंत' परिसरात बेघर, निराधार, दिव्यांग, असहाय वृद्ध आणि अनाथांसोबत भाऊबीज साजरी करण्यात आली. रुग्णालय परिसरात हा सोहळा संपन्न झाला. माणुसकीची भिंत उपक्रमाच्या महिला सदस्यांनी टोपी, टॉवेल, नारळ पेढा देऊन वंचितांना ओवाळलं . ओवाळणी कार्यक्रमानंतर सर्वांना भोजन देण्यात आलं . गेल्या ९ वर्षांपासून माणुसकीची भिंत कडून हा उपक्रम सुरू आहे.***

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

नागपूरच्या मिहान आर्थिक क्षेत्रात, सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस ही कंपनी, २३३ एकर क्षेत्रात, अत्याधुनिक संरक्षण आणि एरोस्पेस उत्पादन प्रकल्प उभारणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या प्रकल्पासाठी भूखंडाचं वाटप रामगिरी इथं आयोजित कार्यक्रमात, करण्यात आलं. कंपनीचे अध्यक्ष, सत्यनारायण नुवाल यांना हा भूखंड, सुपूर्द करण्यात आला.या प्रकल्पात १२ हजार ८० कोटींची गुंतवणूक होणार असून, सहा हजार ८०० प्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील. तसंच ६८० कोटींची, अतिरिक्त गुंतवणूक करून, विमान आणि संरक्षण उपकरण निर्मिती केंद्र, उभारले जाईल. ज्यामुळे आणखी, ८७५ रोजगार संधी निर्माण होतील.मुख्यमंत्री फडणवीस यांनी हा उपक्रम ‘मेक इन इंडिया’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’ला बळकटी देणारा ठरेल असं सांगितलं. या प्रकल्पामुळे, नागपूरला आंतरराष्ट्रीय स्तरावर संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून, ओळख मिळणार असून, विदर्भाच्या औद्योगिक प्रगतीस नवे बळ मिळेल.

**संजय जाजू**

केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी आज अकोला आकाशवाणी वरून प्रसारित होणाऱ्या किसानवानी, लोकसंगीत यासह विविध कार्यक्रमाबाबत NEWS On AIR ॲप तसेच अकोला आकाशवाणीने मागील ३३ वर्षात केलेल्या कार्याचा आढावा घेतला. याप्रसंगी संजय जाजू यांनी अकोला आकाशवाणीच्या माध्यमातून स्थानिक जाहिरात संकलनाच्या कार्याला गती द्यावी, प्रेरणादायी कार्यक्रमाची निर्मिती करावी बहुजन हिताय बहुजन सुखाय ब्रीद सार्थकी ठरवण्याचे निर्देश दिलेत.

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी, केंद्रीय आरोग्य मंत्री, जे.पी. नड्डा यांना पत्र लिहून, असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटच्या अर्थात AID शिफारशीनुसार, नागपुरात, सेंट्रल ड्रग्ज स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन अर्थात C.D.S.C.O. कार्यालय स्थापन करण्याची विनंती केली आहे.AID चे अध्यक्ष आशिष काळे यांनी सादर केलेल्या निवेदनात, नागपूर हे औषध आणि रसायन उत्पादनाचे वाढते केंद्र असल्याचं नमूद केलं आहे. सध्या महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि गुजरातमधील उद्योगांना दूरच्या C.D.S.C.O.कार्यालयांवर अवलंबून राहावं लागतं ज्यामुळे, विलंब आणि खर्च वाढतो.नागपुरात कार्यालय स्थापन झाल्यास औषध उद्योगांना वेळेवर मंजुरी, जलद प्रक्रिया आणि कार्यक्षम पुरवठा साखळीचा लाभ मिळेल.

**सरदार पटेल जयंती**

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या, दीडशेव्या जयंती निमित्त, नंदुरबार जिल्ह्यातल्या, शहादा शहरातून, सरदार सन्मान यात्रेला आज सुरवात झाली. कुकडेल इथल्या, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याला, पुष्पहार अर्पण करुन ही, सरदार सन्मान यात्रा सुरु झाली. २८ ऑक्टोंबर पर्यत, नंदुरबार जिल्ह्यातल्या, १२०हुन अधिक गाव-खेड्यांमध्ये भ्रमंती करुन, ही यात्रा एकता स्वाभिमान आणि राष्ट्रसेवेचा संदेश देणार आहे.

**आदि कर्मयोगी**

यवतमाळच्या कळंब तालुक्यातील, गणेशवाडी पोड इथं, आदिवासी विकास मंत्री, अशोक उईके यांनी, आदि कर्मयोगी अभियाना अंतर्गत, आदि सेवा केंद्राचं, उद्घाटन केलं. या सेवा केंद्रांच्या माध्यमातून, आदिवासी विकास विभागाच्या, विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्याचा उद्देश, पूर्ण होत असून, शिक्षण, आरोग्य, शेती, महिला सबलीकरण आणि, कौशल्य विकास यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये, विकास घडवून येत असल्याचं, उईके यांनी सांगितलं.यावेळी मंत्री, अशोक उईके यांनी, आदिवासी महिलांना, भाऊबीज ओवाळणी निमित्त, भेटवस्तू दिल्या.

**क्रिकेट**

अॅडलेड इथं ऑस्ट्रेलियाविरुद्ध दुसऱ्या एकदिवसीय सामन्यातही, भारताचा पराभव झाला. भारतानं ५० षटकांत उभारलेलं ९ बाद २६४ धावांचं आवाहन ऑस्ट्रेलियानं ४६ षटकांत ८ गडी गमावून पूर्ण केलं. यासोबतच ऑस्ट्रेलियानं, ही तीन सामन्यांची एकदिवसीय क्रिकेट मालिका, २-० अशी जिंकली आहे.नाणेफेक जिंकून, ऑस्ट्रेलियानं भारतीय संघाला, फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. विराट कोहली सलग दुसऱ्या सामन्यात, शून्यावर बाद झाला. कर्णधार शुभमन

गिल, ९ धावा करुन बाद झाला. सुरुवातीच्या पडझडीनंतर रोहित शर्मा आणि श्रेयस अय्यर यांनी, शतकी भागीदारी करत डाव सावरला. रोहित शर्मा ७३ तर श्रेयस अय्यर ६१ धावा करुन बाद झाले.

**क्रिकेट महिला**

आय.सी.सी.महिला विश्वचषक स्पर्धा आता, अंतिम टप्प्यात पोहोचली असून, भारतीय संघाचा सामना आज, मुंबईत, न्यूझीलंडविरुद्ध होत आहे. दोन्ही संघांसाठी हा सामना, अतिशय महत्वाचा आहे. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून, प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा, भरतोय संघाच्या 45 षटकांत 2 गडी बाद 302 धावा झाल्या होत्या. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका, सुपर-फोर फेरीसाठी, पात्र ठरले आहेत. आजच्या सामन्यातून, चौथ्या स्थानावरील संघ ठरणार आहे. भारत आणि न्यूझीलंड संघांचे गुण, समान असून, सरस धावगतीत भारत, न्यूझीलंडपेक्षा पुढं आहे.

**अभिनव बिंद्रा**

भारताचा ऑलिम्पिक पदक विजेता नेमबाज अभिनव बिंद्रा यांना पुढच्या वर्षी होणाऱ्या हिवाळी ऑलिम्पिक स्पर्धेचा मशाल वाहक म्हणून निवडण्यात आलं आहे. ही स्पर्धा पुढच्या वर्षी ६ ते २२ फेब्रुवारी या दरम्यान इटलीत मिलान आणि कोर्टिना-डी-अमपेत्झो इथ होणार आहे.

**हवामान**

बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये, उद्या, वादळी पर्जन्यमानाचा, येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर २५ आणि २६ तारखेला, संपूर्ण विदर्भात, वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता, प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे.

*****